# प्रकरण ५ वे

## वाङ:मयीन सौंदर्य

ज्यातून मानवी आकांक्षाची तृप्ती होते. त्याला मूल्य असे म्हटले जाते. ज्यामुळे वाङ:मयीन आनंद लाभतो, ती वाङ:मयीन मुल्ये होत. त्यादृष्टीने 'सत्यम-शिवम-सुंदरम' चा उल्लेख केला जातो. परंतु वास्तवता, हितकरिता, औचित्य, सूचकता व संयम या सर्वा खेरीज वाङ:मयीन सौंदर्य पूर्णतेला जात नाही. सौंदर्य हे वस्तुनिष्ठ असो वा दृष्टिनिष्ठ असो त्याचा ज्याला ज्याला आभास वा साक्षात्कार होतो, त्याला त्या ठिकाणी काही तरी अनुभूत अशी सुसंगती, सुसंवाद, सुरेलता जाणवलेली असते यात संशय नाही.

सौंदर्याबद्दल वा. ल. कुलकर्णी म्हणतात "सौंदर्य म्हणजे सुसंगती, सौंदर्य म्हणजे निर्दोष अशी संपूर्णता व स्वयंपूर्णता सौंदर्य म्हणजे अंर्तबाहय सुसंवाद, प्रमाणबध्दता हेच ते तत्व होय". [१]

आत्मचरित्रात्मक कादंब-याचा उद्देश प्रमुख्याने जीवनव्यवहारातील नाना अंगोपांगामधील नानाविध सत्ये ज्या प्रत्यक्षातून जाणवतात त्यातील अत्यंत सूचक, संबध्द अशा तपशिलांच्या मदतीने ती व्यक्त करणे, त्यातील संगती, त्यातील सौंदर्य हे वाचकांच्या नजरेला आणणे हाच असतो.

'झोंबी', 'नांगरणी', 'घरभिंती' या आत्मचरित्रात्मक कादंब-यामधून होणारे सौंदर्यदर्शन हे विविध पातळीवरचे आहे.

### मानवी प्रवृत्ती

'झोंबी', 'नांगरणी', 'घरभिंती' या तिन्ही आत्मचरित्रात्मक कादंब-यामध्ये लेखकाला अनेक सुष्ट व दृष्ट प्रवृत्तीच्या व्यक्ति भेटल्या.

**'झोंबी' मध्ये भेटलेल्या सुष्ट व दृष्ट प्रवृत्तीच्या व्यक्ति :**

साकेकर मास्तर, निंबाळकर मास्तर, बापूचा म्हातारा, सिदध माळकर, लक्षू म्हातारा, माने मास्तर, कदमाचा शिर्प्या, घाटगे मास्तर, बापू कोळी, चंद्रकांत मेरवाडे, सुरेश माने, रणदिवे मास्तर, फाळक्याचा शिर्प्या, मळयात कामाला ठेवलेला गणपा, रामूनाना, दत्ताजीराव देसाई, हळदीकर, विठोबा आण्णा (सणगर), वसंत पाटील, मंत्री मास्तर, न. वा. सौदलगेकर मास्तर, नाईक, सणगर मास्तर, रणदिवे, कट्टी सर घर सोडून

चाललेल्या लेखकाला परत घरी आणणारा गोपातात्या अशा अनेक सुष्ट प्रवृत्तीचे लोक भेटल्यामुळेच लेखक घडत गेला तर,

अक्कोळकर सर, घाटगे क्लार्क, किशा माळकर, खासबागेतले मुख्याध्यापक अशा काही थोडयाच दृष्ट व्यक्तिमुळे त्यांना आपल्या शिक्षणात अडथळे सहन करावे लागले.

**'नांगरणी'मध्ये भेटलेल्या सुष्ट दृष्ट प्रवृत्तीच्या व्यक्ती :**

विठोबा सणगर, बापूसाहेब सुतार, निकमसाहेब, शिर्पा, आबाजी, गोपातात्या, रत्नागिरीला रेल्वेतून जात असताना ओळख झालेले देवधर यांनी केलेली मदत, वस्तीगृहातील आबा, तुकाराम, चिटणीस सर, प्रिन्सिपॉल भावे, पु. ल. देशपांडे, सुनीताताई, जे. पी. नाईक अशा अनेक व्यक्तिंना लेखकाला शिक्षणासाठी मदत केली. तर,

शाळा संपल्यावर पुढे काय करायचे म्हणून हेडमास्तरला विचारायला गेल्यावर त्यांनी कारकूनाची नोकरी करण्यास सांगितले, तसेच कोल्हापूरला गेल्यावर नोकरी न देणारे भालजी पेंढारकर व गोड बोलून मार्गी लावणारे बाळ गजवर भेटले, सर्वोदय छात्रालयातील काही कार्यकर्ते स्वार्थी होते म्हणून त्यांनी त्यातून माघार घेतली. तसेच अनेक प्राध्यापकांनी त्यांना विरोध करण्याचा प्रयत्न केला.

**'घरभिंती' मधील सुष्ट दृष्ट प्रवृत्तीच्या व्यक्ति :**

प्रा. कुरूंदवाडकर, प्रा. भोसले, श्री. पु. भागवत, वसंत पाटीलचे मामा, पत्नी स्मिता, लेखकाचे दोन्ही मामा, विजया राजाध्यक्ष, व. ह. पिटके अशा अनेक व्यक्ति भेटल्या.

तर पुण्यातील घरमालकाने दिलेला त्रास, कॉलेजच्या प्राचार्यांनी दिलेला त्रास, घरातील लोकांनी पैशासाठी दिलेला वैताग, आईचा हेकेखोरपणा, बहिणींच्या नव-यानी केलेली बहिणीची पिळवणूक अशा अनेक समस्यांना तोंड देत लेखक खंबीरपणे उभा राहिलेला दिसून येतो.

## समाज जीवनाचे वास्तव चित्रण

'झोंबी', 'नांगरणी', 'घरभिंती' या तिन्ही आत्मचरित्रात्मक कादंब-यातून समाजजीवनाचे वास्तवचित्रण अनुभवाला येते.

## विवाह विषयक परिस्थिती

'झोंबी' मधील विवाह विषयक परिस्थिती पाहिली तर रतनुचा विवाह वयाच्या आठव्या वर्षी झाला त्यावेळी तारा पाळण्यातच होती. लेखकाच्या बहिणीचे विवाह अगदी लहान वयात झालेले दिसून येतात याला कारणीभुत त्यावेळची असणारी सामाजिक परिस्थिती ही प्रामुख्याने जबाबदार आहे.

'नांगरणी' मध्येही होणारे विवाह लहान वयातील आहेत. लेखकाच्या बहिणीचे विवाह हे आईवडिलांच्या अज्ञानी, आडमुठेपणामुळे होतात. मुला-मुलीच्या मनाचा विचार न करता त्यंचे विवाह केले जातात याचे चित्रण 'नांगरणी' मध्ये दिसून येते.

'घरभिंती' मध्ये लेखकाचा विवाह योग्य वयात होतो. मात्र त्यांच्या भावांचा, बहिणीचा, मित्राचे विवाह कमी वयात होताना दिसतात.

या तिन्ही आत्मचरित्रात्मक कादंब-यातून पाहिले तर जसजशी सामाजिक परिस्थिती बदलत गेली तसतसे विवाह परिस्थिती मध्येही बदल होत गेल्याचे आपल्याला दिसून येते.

## शैक्षणिक परिस्थिती

'झोंबी' मधील शैक्षणिक परिस्थिती स्वरूप वेगळया प्रकारचे आहे. येथे परिस्थिती, रूढी, परंपरा यामुळे मुलांच्या शिक्षणाला पूर्ण विरोध आहे. रूढी, परंपरा, अज्ञानीपणामुळे लेखकाचे वडिल त्याच्या शिक्षणाला विरोध करतात. लेखकाप्रमाणेच हजारो ग्रामीण तरूणांना इच्छा असताना घरातील परिस्थितीमुळे शिक्षण होऊ शकले नाहीत. बुध्दिमान, हुशार असून वसंत पाटील या लेखकाच्या मित्राला शिक्षण घेता आले नाही. अनेक तरूणांना हॉटेलमध्ये काम करावे लागले.

'नांगरणी' मध्ये शिक्षणासाठी लेखकाप्रमाणेच अनेक तरूण शिक्षणासाठी संघर्ष करताना दिसून येतात. त्यासाठी कॉलेज करत अनेक प्रकारची कामे करत होती. शिक्षणाविषयी आपुलकी असणारी अनेक मंडळी या मुलांना सहाय्य करत होती, त्यांना शिक्षणासाठी प्रेरणा देत होती.

'घरभिंती' मधील शैक्षणिक परिस्थिती अतिशय वेगळया प्रकारची आहे. अनेक मुला मुलीना शारीरिक कष्ट करून शिक्षण घ्यावे लागले. तर अमाप पैसा असल्यामुळे शिक्षणाचे महत्व अनेक मुला-मुलीना कळले नाही. सुखसोयी भरपूर असल्यामुळे त्यांचे शिक्षण सुरळीत झाले.

एकीकडे अनेक मुलांना रात्रंदिवस कष्ट करून शिक्षण घ्यावे लागत होते. तर दुसरीकडे वडीलांच्या पैशावर अनेक सुख-सोयीमुळे कोणतेही शारीरिक कष्ट न करता व्यवस्थित शिक्षण मिळत होते.

## राजकीय परिस्थिती

राजकीय परिस्थितीची अनेक प्रसंग 'झोंबी' मध्ये दिसून येतात.

१) महात्मा गांधीजीचा खून झाल्यामुळे त्याचा परिणाम सर्व भारतभर तर झालाच पण ग्रामीण भागात त्याचे स्वरूप उग्र होते. अनेक बहुजन समाजातील लोकांनी उच्चवर्णियांची घरे लुटली. अनेकांचे खून त्यावेळी पाडले गेले. गांधीवधाचा परिणाम सर्व राजकीय व्यवस्थेवर झाला.

२) सरकारचे शेतजमिनीविषयीचे, कुळाला संरक्षण देणारे कायदे लागू झाल्याने सुशिक्षीत पैशेवाल्यानि कोर्टकचे-यात ओळखी पाळखी, संबंध असलेल्या हुशार शेतमालकानी कुळांना बाहेर काढलं. याचा परिणाम लेखकाच्या कुटुंबाप्रमाणेच अनेक कुटुंबावर झालेला दिसून येतो.

<u>'नांगरणी' मध्ये राजकीय परिस्थितीची अनेक उदाहरणे आली आहेत.</u>

१) सर्वोदय चळवळीचे राजकारण, प्रथम लेखकाने त्यात आत्मविश्वासाने जिद्दीने समाजसेवा करण्याच्या इच्छेने कार्य सुरू केले. पण नंतर मात्र त्यातील फुसकेपणा त्यांच्या लक्षात आला.

२) वस्तीगृहात असताना राजकीय पुढा-यांचा दरारा कसा होता याचे चित्रणही येते.

३) गांधीजीनी खादी कपडयांचा केलेली स्विकार याचा परिणाम वस्तीगृहातील मुलांना खादीची कपडे वापरायला लागत होती.

४) गांधीजीने सांगितल्याप्रमाणे चरख्यावर वस्तीगृहातील मुलांना सूत काढावे लागत होते.

५) "भाषावार प्रांतरचनेचा कल्लोळ उठला होता. सबंध देशात जागोजागी वाद माजले होते. तणाव निर्माण होत होते. महाराष्ट्राच्या बाबतीत घोळ निर्माण झालेला. मुंबई महाराष्ट्राला द्यायची की स्वतंत्र ठेवायची, असा प्रश्न होता. सगळा महाराष्ट्र त्यामुळं अस्वस्थ सत्याग्रह होत होते. पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्याविषयी मराठी

माणसाला जे प्रेम होत ते ओसरू लागलेलं. नेहरूंचा डाव बलाढय महाराष्ट्राची शकल करण्याचा किंवा त्याच्या पायात खोडा घालून त्याची गती रोखण्याचा, खच्ची करण्याचा होता, अस वर्तमानपत्र बोलत होती. स्वतंत्र विदर्भाची मागणी पुढ येतेय. बेळगाव, निपाणी, कारवार हे कर्नाटकाला तोडून दिलं जातंय असं म्हटलं जात होत." [२]

६) "विधानसभेवर चालून गेलेल्या नि मुंबई, बेळगांव, निपाणी, कारवारसह संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे अशी मागणी करणा-या मोर्च्यावर मुख्यमंत्री मोरारजीभाई देसाईनी निर्घृण गोळीबार केला होता. त्यात १०५ लोक ठार झाले होते." [३]

७) "सगळयांचा सूर महाराष्ट्राविरूध्दचं केंद्रसरकाचं नि काँग्रेसच कारस्थान हाणून पाडण्याचा होता. दौलतराव निकम संयुक्त महाराष्ट्र झालाच पाहिजे. अशा मताचेच होते, पण पक्ष निर्णय घेईल तो निर्णय मला मानला पाहिजे. त्याशिवाय पक्ष नावाची संघटना अस्तित्वातच राहू शकत नाही अस म्हणत होते. पण त्याच्या या म्हणण्याला बाकीची मंडळी विरोध करीत होती. 'पक्षातून बाहेर पडा' म्हणत होती". [४]

८) 'कोरेगावकर ट्रस्ट संस्था' मधील जे. पी. नाईक या राजकीय व्यक्तिच होत्या. त्याच्या चिठ्ठीने लेखकाच्या राहण्याचा प्रश्न मिटला होता. अशी अनेक उदाहरणे आली आहेत.

'घरभिंती' मध्येही अनेक राजकीय प्रसंग आलेले आहेत. उदाहरणार्थ

१) प्राध्यापक व्यवसायामध्ये प्राध्यापक-प्राध्यापकांच्यामध्ये चालणारी ओढाओढी त्यातून फुलणारे राजकारण होते. प्राचार्य पदासाठी अनेक मार्गांनी एकमेंकाला खाली ओढण्याचा प्रयत्न करणे असे प्रकार चालत होते.

२) नोकरी मिळविण्यासाठी तरूण मुले राजकारणातील लोकांचा वापर करत होते. काही राजकीय व्यक्ति अशा तरूणांच्याकडून पैसे उकळून नोकरी लावत होते.

३) अनेक नवीन कुळकायदे सरकारने अस्तित्वात आणल्याने ग्रामीण भागात कोर्टकचे-यांचे वातावरण येऊ लागले.

४) लेखकाच्या वडिलांनी मालकाविरूध्द कोर्टात दावा टाकला त्यावेळी मालकाचा राजकारणाशी संबंध असल्याने अनेक ओळखी होत्या. त्याचा फायदा घेऊन अनेक वकीलांना त्याने पैसे देऊन आपल्या बाजूने फितवून घेतले होते.

५) २८ मे १९६४ रोजी पंडित जवाहरलाल नेहरू यांच निधन झाले. याचा परिणाम लेखक म्हणतात "सगळा भारत शोकात बुडाला होता. सर्व सार्वजनिक संस्था, सरकारी कार्यालये, व्यापार, उद्योग, सवा आपोआप बंद झाले. नेहरूनंतर देशाला कुणीच समर्थ नेता नाही. याची जाणीव नेहरू असतानाच देशात पसरली होती. पण नेहरू अनपेक्षितपणे तडकाफडकी गेल्यानं आणि अनेक महत्वाचे निर्णय थोडयाच दिवसात घ्यावयाचे होते ते तसेच राहिल्यानं सर्वच भारतीय जनतेला निराधार वाटू लागलं. चीननं नुकत्याच दिलेल्या

जबरदस्त दणक्यानं आणि केलेल्या दारूण पराभवानं जगात भारताची नामुष्की झाली होती." [५]

६) सरकारने पोटगी देण्याचा कायदा केल्याने लेखकाच्या बहिणीला पोटगी मिळालेल्याचा उल्लेख आला आहे.

७) मुंबईत 'शिवसेना' स्थापन झाल्याचा उल्लेख येतो. लेखक म्हणतात "मराठी माणसाला मुंबईत नोक-या मिळेनाशा झाल्या होत्या. अनेक कारणांनी महाराष्ट्राबाहेरची माणस नोक-यात भरली जात होती. त्यामुळ नोक-या नसलेली मराठी तरूण मुल चिडून गेली होती. 'शिवसेनेत' भराभर सामील होऊन शासनावर ताशेरे ओढत होती. या चिडीची आग भडकवण्याच काम खाजगी नि शासकीय सेवक भरतीची निरंकुश यंत्रणा, इंटरव्हयू घेणा-या कमिटयांवरचे अध्यक्ष, सदस्य, संबंधित आमदार-खासदार, पदाधिकारी लाचलुचपती घेऊन उत्तम बजावू लागले होते." [६]

८) भारत-पाकिस्तान युध्दाचा संदर्भही आला आहे. लेखक म्हणतात "इंदिरा गांधीविषयी आदर वाढत होता. त्यांच्या वास्तववादी विचारसरणीचं आणि धडाधड निर्णय घेऊन ते अमलात आणण्याच कौतुक वाढत होतं. त्यांनी धडाडीन बँकाचं राष्ट्रीयीकरण केलं, संस्थानिकाचं तनखे बंद केले नि त्यांना उद्योगाला लावले, रशियाशी वीस वर्षाचा शांतता करार केला. बांगलादेश मुक्त केला, अमेरिकेशी स्वाभिमानानं वागल्या, पाकला अनेक वर्ष उठता येऊ नये असा जबरदस्त तडाखा दिला." [७]

९) प्रामाणिकपणे समाजकार्य करणा-या खर्डेकराना निवडणूकीत हार पत्करावी लागली. तर अप्रामाणिक काम करून अनेक राजकारणी निवडून आले.

१०) १९७३ च्या नोव्हेंबर -डिसेंबरात सीमाप्रश्न ज्वलंत झाला. याचा परिणाम समाजात काळाबाजार वाढला. लेखक म्हणतात, "सरकारचं जनतेवरचं नियंत्रण सुटलं होत नि जनतेचा सरकारवरचा विश्वास उडाला होता. दरारा राहिला नव्हता. मंत्री आणि सरकारी अधिकारी सुस्त आणि निष्काळजी झाले होते. कामचुकारपणा करत होते. लाच भरपूर खाते होते 'द्या आणि घ्या' अशी स्वार्थी वृत्ती राजेरोसपणे बोकाळली होती". [८]

११) पाकिस्तानच्या युध्दामुळे भारतातलं बरचस सिमेंट नुकत्याच स्वतंत्र झालेल्या 'बांगलादेशाकडं' वळवळ होतं. त्यामुळे बिल्डिंग कॉन्ट्रॅक्टर्सनी सिमेंटमध्ये भेसळ करण्यास सुरूवात केली. याचा परिणाम बांधकामे निकृष्ट दर्जाची होऊन इमारती ढासळू लागल्या या कॉन्ट्रॅक्टर्सना काही राजकारणी लोक सामील होते. यामुळे ते बिनदास्त सिमेंटमध्ये भेळमिसळ करत होते.

'झोंबी', 'नांगरणी', 'घरभिंती' या आत्मचरित्रात्मक कादंब-यातून लेखकाला राजकीय परिस्थितीचे आकलन वाढत गेल्याचे दिसून येते. लोकशाहीत स्त्रातंत्र्य, समता, बंधुत्व या तत्वज्ञानांचा परिचय वैचारीक वाड:मय वाचत नसणा-या अलिकडच्या तरूणांना

ग्रामीण साहित्यामधून वाचायला मिळाले. यामुळे त्यातील भयानकता त्यांच्या लक्षात आली. ग्रामीण साहित्याचा हा एक विजय म्हटला पाहिजे.

## धार्मिक परिस्थिती

'झोंबी' मध्ये अनेक प्रकारच्या रूढी, परंपरा, अंध्दश्रध्दा दिसून येतात. शाळेतील मास्तर मुलांना भुतांच्या गोष्टी सांगत असल्यामुळे गावातील लहान मुले रात्रीची बाहेर पडत नव्हती. जोगतीणीच्या जीवनाचे चित्रणही यात आले आहे. जोगतीणी आपल्या मुलीना वयात आल्यावर उरूसात अथवा जत्रेत घेऊन येत. तेथे त्या मुलीचा व्यवहार ठरत होता. अलिकडे ५ डिसेंबर ९८ च्या 'लोकसत्ता' या दैनिकात आंध्र प्रदेशात स्त्रियांचा लिलावाची बातमी आली. त्यात एल्लूर शहरात ५ हजार रूपये देऊन १६ ते ३० वयोगटातील तरूण स्त्रियांचा जाहिर लिलाव होतो. डामरा व भोगम या दोन जमातीतील स्त्रियांचा हा लिलाव आहे.

संसदेत या प्रकरणाची सर्व पक्षानी गांभीर्याने दखल घेतली ही समाधानाची बाब आहे. कर्मठ हिंदू धर्माने जोगतिणीची प्रथा सुरू केली हा वेश्या व्यवसायच आहे. लैंगिक अनाचाराला दिलेले हे गोंडस नाव म्हणजे देवदासी. याच जोगतिणी पुढे वृध्दावस्थेत आपल्या उदरनिर्वाहासाठी भविष्य सांगणे, जादूटोणा करणे यासारखे प्रकार करतात. याला ग्रामीण भागातील अडाणी, अज्ञानी लोक बळी पडत होते. लेखकाच्या वडीलांना होणारी मुल ते देवाघरच लेणं मानत होते. गावातल्या अनेक वसाड विहिरीकडे कोणी फिरकत नव्हते. कारण त्याला भूतांच्या विविध कथा चिकटल्या होत्या. ग्रामीण भागातील लोक रात्री पडणा-या स्वप्नावर विश्वास ठेवून आपले व्यवहार करत होते.

ग्रामीण भागातील माणसांना दररोजच्या मानसिक ताणातून मुक्त होण्यासाठी सहसा दुसरा कोणताही मार्ग उपलब्ध न झाल्याने हा अडाणी समाज तंत्रविद्या, जादूटोणा, भूतबाधा यासारख्या अंध्दश्रध्देच्या आहारी जात होती.

'नांगरणी' मध्ये धार्मिक परिस्थितीचे चित्रणाचे प्रमाण कमी आहे. कारण येथे परिस्थितीविरूध्द लेखकाचा संघर्ष दिसून येतो. शिक्षणासाठी त्याला अनेक शहरामध्ये जावे लागते. तेथील अनेक समाजात असणा-या खुळचट अंध्दश्रध्दा, लोकांचा अडाणीपणाचे थोडेफार चित्रण आले आहे.

'घरभिंती' मध्ये लेखकाला प्राध्यापकाची नोकरी लागल्यावर प्रथम तो विठ्ठलाचे दर्शन घेऊन प्राध्यापकी व्यवसायाला सुरूवात करतो. मळयाच्या मालकांने कोर्टात केस घातल्यावर लेखकाच्या वडीलांना स्वप्ने पडतात. त्यावर ते विश्वास ठेवताना दिसतात. कोर्टाच्या केसच्या संदर्भात तो देवावर भरवसा ठेवतो. त्यांची नरसोबाच्या दत्तावर अपार

भक्ती दिसून येते. तसेच 'हलसिध्द आप्पा' वर ही त्यांची श्रध्दा आहे. ग्रामीण भागात येऊन तेथील आडाण, भोळया लोकांना लुटण्याचा धंदा देवरसिणी करत होत्या. दिवसभर शेतात घाम गाळून कष्ट करून कमावलेले धान्य या देवरसिणी लूटून नेत होत्या. पुण्याला लेखकाचे वडिल असताना करमत नव्हते म्हणून मारूतीच्या देवळात जाऊन बसत होते. लेखकाची पत्नी वंशाला दिवा पाहिजे म्हणून उपवास करते. मांत्रिकावर विश्वास ठेवताना दिसून येते.

अशा प्रकारच्या अनेक श्रध्दा, अंध्दश्रध्दा 'घरभिंती' तून दिसून येतात.

## निसर्गवर्णन

"ज्याप्रमाणे जात्यातून पिठ बाहेर येते तसे ओठातून गाणे बाहेर येते" असे बहिणाबाई म्हणतात. त्याप्रमाणे 'झोंबी','नांगरणी','घरभिंती' या आत्मचरित्रात्मक कांदब-यातून निसर्गवर्णन आले आहे. या कादंब-यातून लेखकाने निसर्गवर्णनाचा वापर विविध प्रकारे केला आहे. कधी शेतात असताना, कधी प्रवासात, कधी खिन्न असताना, मनाने दु:खी असताना केला आहे.

'झोंबी' मध्ये अनेक ठिकाणी निसर्ग वर्णन आले आहे. काही ठिकाणी हे निसर्गवर्णन उत्कटतेने आलेले आहे.

उदाहरणार्थ -

१) लहानपणी लेखक वडीलांच्या काखेला बसून शेतात गेल्यावर पाटातून वाहणा-या पाण्याकडे बघून म्हणतात. "झुळझुळत्या पाण्यात हात घातला हाताला भूळभूळ गुदगुदल्या झाल्या बरं बरं वाटल. मग वर बघितल जग वरच राहिलेलं त्यावर आभाळ डब घातल्यागत दिसू लागलं. पाण्यात वळवळणरे मासे त्या गढूळ पाण्यात बघितले. दगडातनं झिरपणारे वाकीचे झरे बघून पाण्यालाही जीव आहे. जमिनीच्या पोटातन वाट हुडकत ते या विहिरीत येतंय अस काही तरी वाटू लागल". [९]

२) मळयात असताना रामफळ, सिताफळ, भोकरं, जांभळ, कोवळे नारळ, गाभुळलेल्या चिंचा रगड खाल्ल्या रायवळ आंब्याच्या किती तरी जाती जाखल्या, लेखक म्हणतात "हा मळा वयाच्या सातव्या वर्षी सोडला तरी, या मळयाच्या उशानं वाहणारा ओढा, मनात पाट करून सतत झुळझुळतो. ओढयाच्या काठांवर दोन्ही बाजूंना देवनळयाची बेटं, चिंचा, आंबे यांची झाड दाटकिर्र होती. देवनळयाच्या बास-या मला धोंडया करून देत असे. चिंचा आंबे यांची गाभूळलेली नि पाडाची पड खाऊन खाऊन दात आंबून जात. ओढयाच्या निवान्तात देसायाच्या कुलपुरूषाची उंच उंच थडगी देवळासारखी बांधलेली होती." [१०]

३)	रानात कामाला जाताना त्याना दिसलेला निसर्ग त्यांनी रेखाटला आहे ते म्हणतात, "दिसाचा गोंडा फुटायला धरलेल्या मोटा, दीस डोक्यावर मध्यभागाला आल्यावर सुटल्या की तास दोन तास दोन तास इस्वाटा मिळायचा. मळयावर सगळीकडं ऊन रणरणायच. बारक्या पोरांना मोकळीन मिळायची. त्यांच्यावर पहारा करणारं डोळ मिटलेलं असायचं. मळा ओढयाच्या कडेला सखलात होता. एका बाजूला गाव आणि दुस-या बाजूला माळच माळ पसरलेला. वरच्या बाजूला प्रचंड भुईकोट किल्ला, तर खालच्या बाजूला म्हारकीची रानं पसरलेली ...... ही मोकळी रानं बघितली की, जिथं जिथं गेलो नाही तिथं तिथं जाऊन यावं, काय काय आहे पाह.वं अस वाटायच. मळावर अनेक जागा अशा होत्या. किल्ला, किल्याचा खंदक, तिथले चढउतार, तिथं दिसणारी भुयारं, चोरवाटा, गंजीखाना, नकटीखण, घुगूळ घुमट, भरमकराच्या मळयातल्या कण्हे-या, अस काहीबाही बघायची उत्सुकता उन्हाच एकट बसल्यावर शिगेला जाई."

" .......... नजर जिथवर पोचेल तिथवर सगळा माळ, आणि त्याच्यावर अशा काही खाणाखुणा आणि डोईवर तसंच पसरलेलं विस्तीर्ण आभाळ" [११]

४)	महिन्यांचा व ऋतुंचा वापर करून लेखकाने शेतातील कामाचा उल्लेख केला आहे. यामुळे निसर्गाचे वर्णन बहारदार झाले आहे. लेखक म्हणतात " वैशाखचं उन वाढू लागलं तसा उन्हाळा जाणवू लागला" यावरून त्यांना उन्हाळयातील कामाची चाहूल शेतक-यांना लागली हा संकेत दिला आहे.

५)	लेखकाने प्रत्येक वेळी निसर्गाच वर्णन करताना त्याला वास्तवाची जोड दिली आहे. निसर्गवर्णनातून पुढील कल्पना त्यांनी मांडली आहे. एस. एस. सी. पास झाल्यावर ते घरी परताना केलेले वर्णन अतिशय सहज सुंदर आहे ते म्हणतात" बेडकासाररखा उंच उंच उडया मारत घराच्या दिशेनं धावलो. मनातून अनेक बेडूक विहिरीबरोबर पडले होते. त्यांच आकाश आता मोठ झालं होतं. कष्ट, उपासमार, ओढाताण, अज्ञान, जुलूम यांच्या बाहेर त्यांची उडी गेली होती. नवे विस्तीर्ण क्षितिज दिसू लागली होती. काम करायचं नक्की नव्हतं पण एकदम मोकळया हवेत आल्यासारख वाटत होतं" [१२]

'नांगरणी' मध्ये आलेल्या निसर्गाचे चित्रण विस्तारपूर्ण विविध ठिकाणचे आहे. कारण लेखक शिक्षणासाठी प्रथमच घराबाहेर पडला होता. त्यामुळे अनेक ठिकाणचे निसर्गवर्णन आले आहे त्याची अनेक उदाहरणे आली आहेत.

१)	"शिक्षणासाठी रत्नागिरीला जाताना ते म्हणतात " पश्चिमेच्या दिशेन डोंगराडोंगरातन वळण घेत गाडी सारखी पळत होती मला आई दादापासनं, माझ्या गावापासनं, ओळखीच्या माणसापासनं लांब लांब पळवून नेत होती. त्याचा घरात कुणालाही पत्ता नव्हात" [१३]

२)   रत्नागिरीला जाताना प्रवासात त्यांना निसर्गाकडे पाहून घरची आठवण होते ते म्हणतात "पाऊस तर बाहेर धो धो पडलेला डोंगरातून घाटेच्या उतारावरा पांढरेशुभ्र पाण्याचे ओहळ वाहताना दिसत होते. उंचावरून खाली कोणीतरी साखरेची पोती ओततय. नि ती साखरच वाहतेय, असं वाटतेलं, पावसाच्या दाट धारांमुळे भोवतालच्या निसर्ग अंधूक झाला होतो. झाड धूसर दिसत होती. पावसात ती शांत उभी राहून न्हात होती. गूढ वाटत होती. मधूनच एखादा ढग समोरच्या झाडांना घसटून त्यांच्यावरून हळुवार हात फिरवत जातो आहे, धुवाधार पावसात त्यांना धीर देतो आहे, असं वाटत होत. जाथाच्या दगडांचा आणि लाल मातीचा रस्ता धुऊन स्वच्छ झाला होता. त्यावर पाणी कावळयाच्या डोळयासारख स्वच्छ दिसत होत. हे सगळ नवं नवं बघाव अस वाटत होत मधूनच घराची आठवण होऊन हुरहुर लागत होती." [१४]

३)   शिक्षणासाठी रत्नागिरीला आल्यावर लेखक समुद्रावर फिरायला जातात, ते म्हणतात "समुद्राच दर्शन झालं. माझे हात जोडले गेले. डोळे मिटून मी नमस्कार केला. नजरेसमोर नुसतं. पाणीच पाणी नजरेच्या शेवटच्या टप्प्यावर पाण्याचाच निळानिळा पर्वत झाल्यासारखं दिसत होत. तो पर्वत नि आकाश एकमेकात मिसळून गेल होत. समुद्राच्या निमित्तान पृथ्वी आकाशात मिसळली होती. पाण्याच नातं पृथ्वीशी नि आकाशाशीही दृढ होत." [१५]

४)   रत्नागिरीला असताना भूदान कार्येकते यांच्याबरोबर ते पदयात्रेला गेले त्यावेळी ते हणतात, "पालीच्या मुक्कामात सूर्य चक्क नैऋत्येला उगवला. मनाची कितीही समजूत काढली की सूर्य उगवतो ती दिशा पूर्व समजायची. पण ती समजूत काही पटत नव्हती. मनांन मनात एक पूर्व दिशा ठरवलेली असे... निसर्गाची अनेक रूप बघायला मिळाली. माझ्या देशावरच्या गावाकड झाडी, निसर्ग होता, सगळ काही होत. पण इथल्या निसर्गाचं रूप विलक्षण सुंदर आणि वेगळ होत. पालीच्या डोंगराच्या माथ्यावर आम्ही आलो. नुसत गवत नि भाताची रानं दिसत होती. सकाळच्या उन्हात हया गवताच्या सोनसळी काडया चमकत होत्या. झिप-या भातावर पडलेली उन्हंही पिकू आलेल्या भाताच्या रंगामुळ सोनेरी, सुगंधी वाटत होती. त्याचा घमघमाट भाताच्या शेतावर सुटलेला त्या माथ्यावरनं आसपासच्या अनेक डोंगराचे माथे दूरवर दिसत होते. त्यातली दोन शिखर चक्क पांढ-या शुभ्र ढगात आपल्या चोची खुपसून बसली होती. जणू स्वर्गाची वाढ त्या डोंगरावरून ढगात आणि ढगावरून स्वर्गात असल्यासारखी वाटत होती.

हया डोंगरावरून खाली उतरणीला आम्ही लागलो. उतरणीला लागलो तशी विरळ विरळ वाटणारी झाली दाट दाट होत गेली नि आम्ही झाडीत नाहीसे झालो. पठारावरून दिसणारा सूर्यही झाडीमुळ नाहीसा झाला. जितकं उतरणीला लागून खाली खाली जाव तितकी झाडी दाट दाट होत जाणारी " [१६]

५) शेतावर गेल्यावर शेताकडे पाहून गलबलून आले ते म्हणतात, "वाळल्या शेतक-यांचे सगळ बांध उघडे पडले होते. शेतातली जोंधळा, भुईमूग, तूर, मूग, उडीद ही पिंक आता उलंगली होती. ढोरांना बांधावर दात घासायला नि शेरडांना झुडपं ओरबडून खायला सगळ रान उघड पडल होत. लांबलांबची आंब्याची, पिंपळाची, चिंचाची, निबांची नि अशीच कशाबशाची झाडं बांधावर सनातन कुलपुरूष उभा राहिल्यासारखी वाटत होती " [१७]

६) पुण्याला रेडिओवरती नोकरी लागल्यावर लेखक पुण्याला निघाला तेव्हा प्रवासात असताना निसर्गाची व आपल्या अंर्तमनाची सांगड घातलेली दिसून येते. ते म्हणतात, "गाडी पुण्याच्या दिशेन सुसाट चालली होती. माणसं असूनही मी गाडीत एकटाच होतो. मनात खोल खोल जाऊन पुन्हा वर येत होतो. मागे पडणारा प्रदेश बघत होतो. सपाट हिरवी ऊसरानं, आभाळाकडं मुख असलेले झाडांचे गुलजार गुच्छ, उताणे पडलेले विचारवंत निळे डोंगर नि त्यांच्याच पोटात शिळापाषाण, झाडीझुडपे, शेते यांनी भरलेल्या द-या खलाटया, आसपासची शेती करण्यासाठी तिथंच वस्ती करून राहिलेली मराठी खेडी, त्यातली खेडवळ माणसं, त्यांची बैठी घरं नि खोपट सगळी झपाटयानं माग पडत होती " [१८]

पंढरपूरला प्राध्यापकाची नोकरी लागलयावर ते पंढरपूरला एस्.टीतून प्रवास करताना म्हणतात, " रस्त्याकडेची खेडीपाडी भराभर माग सरत होती. त्यांच्यावर शेकडो ढगांनी भरलेल मृगाचं काळभोर आभाळ " [१९]

'नांगरणी' मधील निसर्गवर्णन अवास्तव नाही ते विषयाला धरून आलेले आहे. त्यामुळे ते सहजसुंदर झाले आहे.

'घरभिंती' तून येणारे निसर्गवर्णन हे थोडेच आहे. कारण या आत्मचरित्रात्मक कादंबरीत लेखकाचा सर्व वेळ आपल्या घराचा विकास करण्यात आणि विविध प्रकारची काम्र करण्यात गेला आहे. तरी अनेक ठिकाणी निसर्गाचे वर्णन आलेले आहे.

१) पंढरपूरला गेल्यावर लेखक विठ्ठलाच्या दर्शनासाठी मंदिराकडे जातो. त्यावेळी ते म्हणतात "सूर्य उगवला होता. मृगाचे ढग आड आल्यानं दिसत नव्हता तरी त्याच्या कोवळया प्रकाशाची प्रभा ढगावरून खाली सांडत होती. देवादिकांनी आकाशातून रूपेरी अर्ध चंद्रभागेत सोडाव तशी भासत होती " [२०]

२) लेखकावरचा आईचा राग शांत झाला हे सांगण्यासाठी ते मार्मिकपणे निसर्गाचा वापर करतात ते म्हणतात "सगळे सगळे ढग वितळून आभाळ स्वच्छ झाल होतं." [२१]

३) बहिण सुंदरानं वेदगंगेच्या नदीत आत्महात्या केल्यावर ते म्हणतात "वेदगंगेच्या पुरच घोंघावत जाणार पाणी नजर पोचेल तिकड पसरलेले. पाण्यात खळखळत भोवरे

निर्माण होणारे. त्यात वेगान पुढ सरकणारा सुंदराचा देह. मुकाटपणे गटांगळया खाणारा हात वर करणारा, लांब लांब जाणारा ....." [२२]

४) शिवाची बायको रागाने घरातून निघून गेल्यावर लेखक तिच्या गावी जातात. तेव्हा तेथील गावाचे वर्णन करताना म्हणतात "डोंगराच्या खलाटीत वस्ती शंभरभर घरांच ओसाडस वाटाव अस गाव. गावाला बागाइती जमीन काहीच दिसत नव्हती. होती ती डोंगराच्या बगलेतरची कोरडवाहू, माळरान, तांबूळ जमीन. गावाच्या सावलात एकदोन विहिरी होत्या. त्या विहिरीच पाणी सा-या गावाला अधनंमधनं एखाद जंगली झाड दिसणार बाकी सारा कोंडा माळ, बोडका डोंगर नि खबदाड यांनी भरलेला भाग. " [२३]

५) घरातील एखादा कर्ता पुरूष स्वर्गवासी व्हावा आणि त्या घराचा समतोल बिघडावा असे वातावरण लेखकाचे वडिल वारल्यावर होतो. यालाच निसर्गाची जोड देऊन लेखक म्हणतात, "मूळ वृक्ष उन्मळून पडला होता. आम्ही त्याच्या सावलीतही रोपटी वेशाखाच्या उन्हाताणात आलो असं वाटू लागल. " [२४]

अशा प्रकारे या तिन्ही आत्मचरित्रात्मक कादंब-यातून निसर्गाचे वर्णन आले आहे. 'झोंबी' मध्ये लेखकाच्या विकास होत असताना भरघोस निसर्गाचे वर्णन आहे तर 'नांगरणी' मध्ये त्याच्या अनेक ठिकाणच्या प्रवासामुळे ओघाने कथानकाला धरून निसर्गवर्णन आले आहे. तर 'घरभिंती' मध्ये घराचा विकास करण्यासाठी त्यांनी केलेली धडपड यामुळे या कादंबरीत निसर्गवर्णनाचे प्रमाण कमी असलेले दिसून येते.

## व्यक्तिचित्रण

'झोंबी', 'नांगरणी', 'घरभिंती' या तिन्ही आत्मचरित्रात्मक कादंब-यातून अनेक व्यक्तिचित्रणे दिसून येतात. त्यातीन प्रमुख व्यक्तिचित्रणे :

### १) रतनु

आनंद यादव यांचे वडील रतनु. त्यांचे लग्न वयाच्या आठ नऊ वर्षाचा असताना झाले. एकुलता एक असलयामुळे लाडात वाढला होता. सातव्या वर्षीच तालमीत जाउ लागल्यामुळे शरीर पिळदार बनले होते. भोकरी रंगाचे पाणीदार डोळे. कटयारीच्या आकाराचे धारदार नाक. फुगवट नाकपुडया, गुटगुटीत अंग, तांबुस गोरा रंग. उन्हात तापला की गाजरासारखा दिसे. शाहुमहाराजांच्या तांबडया मातीत लोळू लागल्यावर तर, तांब्याच्या घासलेल्या घागरीसारखा दिसू लागे. बोलताना रागात, आक्रमक पवित्र्यात बोलल्यागत वाटे. त्याच्या मोठया आवाजाने जनावरंही माग फिरत असे. तरूण असताना कुस्त्या करण्याचा नाद त्याला होता. वडीलांच्या अचानक मृत्यूमुळे त्याला नऊ वर्षाचा असतानाच लग्न करावे लागले. पहिल्यापासूनच त्याला कोणाचा धाक नसल्यामुळे तो आपल्यापेक्षा पाच सहा वर्षानी लहान असलेल्या पत्नीला लिंगडीच्या छडीने मारत होता.

ताराला एकापाठोपाठ मुली होऊ लागल्यामुळे तो ताराचा खूप छळ करतो. बाळा सणगरीला तो आईसारखा मानत होता. तिच्या सांगण्यावरूनच तो ताराला मारायच सोडून देतो. मुलगा झाल्यावर त्याला खूप आनंद होतो. त्याचा हलसिध्द आप्पावर खूप विश्वास आहे. आपलयाला नवसानं पोरगा झाला म्हणून तो सर्व गावाला जेवण देतो. बहिण सारखी माहेरला पळून येत होती म्हणून तो तिला विहिरीत बुचकळून काढतो. हातातल्या सत्तेचा तो मनाला येईल तसा वापर करत होता.

रतनुचा स्वभाव तापट असल्यामुळे त्याला राग आला की कशाचेही भान त्याला राहत नव्हते. आपल्या मुलाला शाळेत घालताना त्याला खूप आनंद होतो. मुलाला शिकवून मोठा करण्याचे तो ठरवतो. पुढे मुलगा जसजसा मोठा होतो तसतसे रतनुचे कामावरचे लक्ष उडते. तो मुलालाच शेतात कामाला लावून गावात रिकाम्या गप्पा मारत फिरतो. कधी कधी तो गावातल्या यल्लू जोगतीणीच्या घरी जाऊन तासन्तास बसत असे. स्वत:चे मत तो कधीही विचारात घेत नसे. एखाद्या प्रतिष्ठित माणसाने सांगितलेलेच तो ऐकत असे. इतर सामान्यांच्या बोलण्याला तो महत्व देत नसे हे सरंमजामी वळण चुकीचे आहे. असे त्याला वाटत नव्हते. त्याच्या मुलाच्या बाबतीत अनेक गुरूजी त्याला समजावून सांगतात पण तो कोणाचेही ऐकत नाही. स्वत:चेच खरे करतो या सगळयाचा परिणाम लेखक कोल्हापूरला पळून जातो. यामुळे रतनु घाबरतो. मुलाचे काही बरेवाईट होईल म्हणून पुन्हा मुलाच्या शिक्षणाला विरोध करत नाही. कोर्टकचे-यात मालकाविरूध्द दावा घालतो त्यात त्याला अपयश येते पण तरीही न घाबरता रात्री पडणा-या स्वप्नावर विश्वास ठेवून राहतो.

लेखक रत्नागिरीला कॉलेजला जातो. तेव्हा तो विरोध करत नाही. शेतातील कामे तो लेखकानंतर त्याचा भाऊ शिवाला लावायला सुरूवात करतो. रतनु मुलखाचा आळशी असल्यामुळे तो लहान मुलांना कामाला लावी. मुलांसाठी आणलेला सर्व खाऊ तो खात होता. तो त्या लहान मुलांचा विचार करत नव्हता.

लेखकाच्या लग्नानंतर मात्र रतनुला वाईट दिवस येतात घरात शिवा व इतर भाऊ त्याला टाकून देतात. तो माडीवर वेगळा स्वयपाक करू लागतो. पुण्यात तो लेखकाकडे येतो तेथेही त्याला करमत नाही. म्हणून बागेतलया माळयाला मदत करतो. मारूतीच्या देवळात जाऊन बसतो. शेवटी त्याचा मृत्यु अतिशय हालाखीत होतो.

रतनु हा लहानपणापासून करारी, तापट होता. पण काळ बदलत गेला आणि रतनुला अतिशय वाईट दिवस आले. शेवटी त्याचा मृत्युही हालाखीने होतो.

२) तारा :

लेखक आनंद यादव यांची आई तारा. ताराच लग्न पाळण्यात असतानाच झाल. महाभारतातल्या कुंतीला तारूण्यापासून दु:खाला सामोरे जावे लागले. तर ताराला पाळण्यात बाशिंग बांधल्यापासून दु:खाला सामोरे जावे लागले. ताराला दोन भाऊ थोरला रामा, धाकटा लिंगाप्पा. ताराचे वडील शिवाप्पा जाधव वाळली शेती फाळयान करायचे. रतनुच्या वडीलांशी त्यांची मैत्री असल्यामुळेच ताराच लग्न रतनुशी झाले. त्यावेळी रतनु नऊ वर्षांचा होता. ताराजा कळू लागल्यावर ती नांदायला जाऊ लागली. तिला लांबून तिचा नवरा दाखवला पण तिच्या बालबुध्दीला कळल नाही. वय लहान असल्यामुळे ती नव-याच्या घरी रहात नव्हती, सारखी माहेरला पळून यायची. रतनु तिला लिंगडीच्या छडीने बडवत आणत होता. सारखी आईकडे जाते म्हणून मारत असे. ती त्याला खूप घाबरत असे. तिला लहान वयातच ऊसात पाणी पाजाव लागत होत. ऊसात रानडुकर, कोल्हा असत यामुळे ती घाबरत पण रतनु तिला चाबकाने मारत असल्यामुळे ती जीव मुठीत धरून पाणी पाजायला ऊसात शिरत होती. सगळया जाचाला कंटाळून ती माहेरी पळून जाते. त्यामुळे तर तीला रतनुचा खूप मार खावा लागतो. लेखक म्हणतात "नवरा चाबूक घेऊन आलेला. त्यान तिच्या डोईवरची बुट्टी गटारात फेकून दिली नि एका हातान बुचडा धरून, दुस-या हातानं चाबकाचे वादाडे देत तो तिला मळयाकड घेऊन गेला. मरूस्तवर बडवून काढली. चाबकाचे कोयडे डोईत मारल्यान चोळी परकर रक्तान न्हाऊन निघाल.शेवटी सासून सोडवून घेतली नि डुईच्या जखमा धुऊन त्यात दातवण भरल." [२५]

अशा प्रकारे लहानपणापासूनच तिला रतनुचा मार खावा लागात होता. ताराला सर्वच मुलीच होऊ लागल्यामुळे तर रतनुचा राग अनावर झाला तो तिला दररोज मारू लागला.

सासू - सासरा वारल्यावर तिचा आधार तुटला होता. दररोज मार खाऊन तिच भय हळूहळू नाहीस झाल होत. रतनुच्या बहिणीने ताराला खूप छळल पण ती खंबीरपणे उभी राहिली.

अनेक मुलांचा संभाळ करत, शेतातील सर्व कामे करून शेवटी तिला रतनुचा मार खावा लागत होता. तरीही ती संसार करत होती. अनेकवेळा तिच्या मनात आत्महत्येचा विचार आला. तसा प्रयत्नही तिने केला. पण लहान लहान मुलांकडे पाहून तिचा निश्चय बदलत होता.

लेखकाच्या वडीलांचा लेखकाच्या शिक्षणाला विरोध होता. पण तारान मात्र अप्रत्यक्षरित्या मुलाच्या शिक्षणाला पाठीबा दिला होता. त्यांच्यासाठी तिला रतनुचा मार खावा लागत होता. बाजाराला गेली की मुलांना खायला आनत होती. स्वत:च्या कपडयांची फिकीर न करता मुलांना चांगले कपडे घेत होती.

ताराला लहानपणापासून अनेक यातना दुःख भोगावे लागले पण त्याला न जुमानता तिने येईल त्या परिस्थितीला तोंड दिले. विविध प्रकारची कामे करून आपल्या मुलांचा संभाळ केला. घरातील आर्थिक परिस्थितीवर मात करून संसार केला. अशी कर्तव्यदक्ष ममताळू तेवढी कठोर असणारी ही आनंद यादवांची आई.

३) **विठोबा सणगर :**

विठोबा सणगर रतनुचा मित्र. तो पाचवी शिकला होता. तो देवनागरी नि मोडी लिपीतले कागद फडाफडा वाचत होता. गावात थोडयाफार शिकलेल्यापैकी तो एक होता. यामुळे घरातली चिठो-या, जुनी कागद, शेत केल्याचा कबुलायती नोकरनामे, मुनसी पालटीच्या पट्ट्या वाचायच्या असतील तर विठोबाला बोलविले जायचे. म्हणून त्यांना दिवाणी म्हणत होते. विठाबाने मुलगा शाळेत घातला त्याची प्रेरणा घेऊनच रतनुचे आपल्या मुलालाही शाळेत घातले. पुढे लेखकाची शाळा बंद झाल्यामुळे विठोबा सणगर रतनुला समजावून सांगतो. तेव्हा पुन्हा लेखकाची शाळा सुरू होते. .अशा प्रकारे अनेक ठिकाणी विठोबा सणगरने लेखकाला मदत केली आहे.

## 'झोंबी' तील म्हाता-यांचे व्यक्तिचित्र

### बापूचा म्हातारा

याच्या मिशा मोठया असल्यामुळे सर्व तोंड त्या मिशाने लपून गेले होते. या मिशा वळणदार होऊन खाली हनुवटीवर टेकलेल्या असत. आपल्या घराशेजारी तो दमेकरी होऊन बसलेला तोंडाने श्वास घेऊन तोंड मिटून ओठाने फुर्रर करत श्वास सोडायचा तो नेहमी चवडयावर बसत असे. कायम तो तोंडासमोरच्या जमिनीकडे बघत असे. एकदा अचानक तो नाक तोंड दाबून धरल्यागत घुसमटत पडला. हळूच त्याच्या जिवणीच्या दोन्ही कडा खाली आल्या. चेह-यावरचा ताण ढिला पडत गेला आणि तो शांत शांत झाला.

### सिद्ध् माळकर :

हा धनगर म्हातारा दारात बसून बटव्यातल सतत पान खाणारा यामुळे सतत खोकून दारातच पानांचे रंगीत बेडके थुंकणारा. यामुळे दारात सतत माशा घोंगावत होत्या. कमरेला नेहमी बारीक लगोटी, काटकुळया झालेल्या पायात सैल अडकलेली असे. दारात बसून हा म्हातारा बायकोला इरसाल शिव्या देत असे. दिवसभर एकटाच घरात जख्ख

होऊन बसे. लहान मुले त्याच्याकडे बघून हसत यामुळे खवळून तो लहान मुलांनाही शिव्या देत असे.

### लक्षू म्हातारा :

हा लेखकाच्या वडीलांचा चुलता तो लेखकाच्या बोळात राहत होता. तो बोळातून बाहेर पडून लेखकाच्या घराच्या वळचणीला बसत असे. त्याच्या अंगात ढगळ फाटका कोट असे. दाढी नेहमी बोट बोटभर वाढलेली. डोक्याला चिंध्या झालेला पटका. पायाच्या तुरकाटया उचलत तो येऊन सकाळी जो वळचणीला बसे ते बारा वाजताच उठे. तो लेखकास इतर लहान मुलांना चिलमीवर ठेवायला विस्तू आणण्यासाठी आमच्या घरात तो पिटाळीत असे. बारानंतर जेवनाची वेळ झाली की तो जेवायला बोळातून आपल्या घरी जाई. स्वतःशीच मोठयाने बोलण्याची सवय त्याला होती. लेखक या म्हाता-याशी गप्पा मारताना तो जुन्या गोष्टी सांगत असे. त्याच्या सांगण्यावरून लेखकाला स्वतःच्या घरातील अनेक गोष्टी समजत गेल्या.

या तिन्ही म्हाता-याचे चित्रण लेखकाने अतिशय वास्तवपूर्ण असे केले आहे. वृध्दांचे कुटुंबात, समाजात, गावात असणारे सीन त्यांची लागणारी नकळत गरज याची प्रचिती आपल्याला येते

## लेखकाला मदत करणा-या अनेक शिक्षकांचे व्यक्तिचित्र

### साकेकर मास्तर :

लेखक प्रथम शाळेत गेला तेव्हा साकेकर मास्तर त्यांना शिकवायला होते. त्यांच्या मुळेच लेखकात शिकण्याची उमेद निर्माण झाली. त्यांनी अनेक प्रकारे लेखकाला मदत केली.

### निंबाळकर मास्तर :

हे खूप कडक होते. जिन्यातील खिडकीतून एकदा बाहेर पाहताना निंबाळकर मास्तरांकडून लेखकाला खूप मार मिळतो. लहान मुलांना निंबाळकर मास्तरांविषयी भिती वाटत होती. पण मोठया माणसांचे त्यांच्याबद्दल खूप चांगले मत होते. लेखकाची आई निंबाळकर मास्तरांबद्दल म्हणतात,"ती माणसं लई चांगली हाईत. तुझ्या जलमाच आधी मी तिथ दूध घालाय जायची. त्यंची बायकू ही आमच्याच तिकडच्या गल्लीच्या मानेरावसायबाची भण हाय." [२६]

## माने मास्तर :

पहिलीत गेल्यावर लेखकाला शिकवायला माने मास्तर होते. ते अंगाने जाड होते. स्थूल पैलवानासारखे माने मास्तरांचे केस पांढरेशुभ्र होते. ते चार चार दिवस दाढी करत नसत. त्यामुळे त्याच्या दाढीमिशा पांढ-याशुभ्र दिसत. लेखकाप्रमाणे इतर मुले माने मास्तरांची मर्जी संपादन करण्यासाठी त्यांच्या मुलाला खुशीत ठेवत असत. माने मास्तराला वावगे प्रश्न विचारलेले आवडत नसत. लेखकाचा मित्र शिर्प्याला विडया ओढतो म्हणून माने मास्तरांनी खूप मार दिला.

## घाटगे मास्तर :

लेखक चौथीला गेल्यावर घाटगे मास्तर त्यांच्या स्वभावामुळे लक्षात राहिले. या मास्तरांचा घाटगे घराण्याशी संबंध होता. त्यांचा आवाज चांगला होता. एखादी कविता अथवा धडा शिकवताना ते रंगून जायचे. नाटयपूर्ण आवाजात संवाद म्हणून दाखवत, हातवारे करायचे. इतिहास शिकविताना सभिनय शिकवायचे वर्गाचे दार झाकून त्यांनी मनात काल्पनिक केलेले संवाद काल्पनिक तलवारीला हात घालून म्हणून दाखवत असत.

त्यांचे वागणे सर्वापेक्षा वेगळे होते. मांडीवर गुडघ्यापर्यंत फुगीर असलेली आणि गुडघ्याखाली पिंढरीबरोबर गच्च असलेली सरदारी विजार घलीत. शाळेत काही कार्यक्रम असला की ते दरबारी कोल्हापुरी रंगीत पटका उत्तम रितीनं बांधत. त्यांना विडया ओढण्याचा नाद होता. ते उत्तम शिव्याही देत असत. गावातून फिरताना मुलांच्या वडिलांशी संबंध ठेवत. कु-हाडीनं लाकडं फोडत, वर्गात त्यांची शिस्त अतिशय कडक होती. वेळेवर येणा-या मुलापासून ते वर्गात गडबड करणा-या मुलांपर्यंत ते मार्क देत होते. वर्गात एकदा ते गोष्ट सांगत असताना मध्येच दोन मुल बोलताना त्यांना आढळली. त्यांनी त्यांना दोन लाथा घातल्या आणि शेवटी त्यांना तळमळीने जाऊन विचारणाही केली. वर्गातील एखाद्या मुलाला काही झाले तर ते मदतीला पुढे असत. प्लेगच्या साथीच्या वेळी शाळेतील मुलांप्रमाणे लेखकानेही मास्तरांना झोपडी बांधण्यास मदत केली. पण लेखकाचे दप्तर 'गजा' नावाच्या मित्राने लपवून ठेवल्याने व मास्तरांच्या कामाला जाऊन त्यांनी दप्तर व्यवस्थित ठेवण्याची काळजी न घेतल्याने घाटगे मास्तर लेखकांच्या मनातून उतरतात.

## मंत्री मास्तर :

मंत्री मास्तर खूप कडक होते. ते छडी वापरत नसत. हाताने मानगूट वाकवून पाठीत दणके देत असत. यामुळे मुलांच्या मनात त्यांची दहशत निर्माण झाली. यामुळे दंगा करणा-या मुलांच्यावर त्यांची दहशत बसली. ते गणित शिकवत होते. एखाद्याच गणित चुकल की त्याला स्वत: जवळ बोलावून बुकलून काढायचे. त्यामुळे सगळयांना घाम

फुटायचा. लेखक गणितात हुशार असल्यामुळे मंत्री मास्तर त्यांना प्रेमाने 'आन्दया' अशी हाक मारत असत.

## न. वा. सौंदलगेकर :

सौदलगेकर मास्तर मराठी विषय शिकवित होते. शिकविताना ते अतिशय रमून जात. ते कविता अतिशय उत्तम रीतीने शिकवित होते. उत्तम चाल, चांगला स्वर असलेला गळा होता. जोडीला रसिकता होती. जुन्या नव्या मराठी कवितांबरोबरच अनेक इंग्रजी कविताही त्यांच्या पाठ होत्या. वृत्ताच्या सुंदर चाली त्यांना सहज येत होत्या. ते कविता सभिनयरीतीने शिकवत होते. सौदलगेकर मास्तरांच्या कविता शिकविण्याच्या लयीमुळेच लेखकाच्या मनात कवितेविषयी प्रेम निर्माण झाले. त्यांना कविता करण्यास प्रेरणा मिळाली. सौदलगेकर मास्तर स्वत: कविता करत होते. अनेक मराठी कवीचे संग्रह त्यांच्या घरी होते. त्या कवीची चरित्रे त्यांच्या आठवणी ते सांगत. लेखक कविता करत आणि सौदलगेकर मास्तरांना दाखवत ते त्यामधील त्रुटी दाखवत असत. यामुळे मास्तरांशी जवळीक निर्माण झाली. कवितेतील शब्दांचे वेड लेखकाला लागले. लेखकाला कवितेला खरी प्रेरणा सौदलगेकर मास्तरांच्यामुळे मिळाली. त्यांनीच लेखकाला प्रोत्साहन दिले.

## तु.बा.नाईक :

हे भूमिती शिकवायचे. ते स्वत: बॉयस्काऊटची चळवळ चालवत. बालवीरांना करता येतील अशी अभिनय गीतं आणि 'आदर्श बालवीर' नावाचं एक पाच अंकी आणि बहुप्रवेशी संगीत नाटक त्यांनी लिहिलं होतं. शाळेच्या वाढदिवसाच्या वेळी ते मुलाकडून बसवून घेत. मुलांच्याकलेचे कौतुक ते करत होते. भूमितीसारखा विषय ते अतिशय मनोरंजक पध्दतीने शिकवित त्यामुळे वर्गातील मुलांना शिकविण्यास प्रेरणा मिळत असे. लेखकाच्या कविता पाठांतरांचे त्यांनी कौतुक केले. अनेक नकला करून लेखकाने दाखविल्यावर नाईक मास्तरांनी खूप प्रोत्साहन दिल.

## ज्ञा. बा. सणगर :

हे चित्रकला विषय शिकवायचे. लेखकाला ते आन्दया म्हणून हाक मारायचे. वर्गात दंगा केला की ते मारत असत. लेखकाला दंगा केला नसला तरी मार बसत होता. यामुळे त्यांची भिती त्यांना वाटत होती.

### अक्कोळकर सर :

अतिशय कडक शिस्तीचे होते. ते धोतर नेसत होते. त्यांची चाल ऐटबाज होती. आवाज करडा नि गंभीर. डोळे मोठे, ताबारल्यासारखे वाटणारे, कपाळावर आठयांच त्रिशूल कायम होते. आल्या आल्या त्यांनी लेखकाला दम दिला आणि राहिलेली फी भरण्यास सांगितले. इतर शिक्षक लेखकाची परिस्थिती समजून घेणारे होते. पण अक्कोळकर सरांनी लेखकाला समजून घेतले नाही. हेडमास्तरांशी चर्चा केल्यावर तर अक्कोळकर सरांनी लेखकाला काटावरच धरले. याचाच ढोक धरून ते लेखकाला वर्गात सारखे मारत होते. लेखकाला ते नेहमी मानेवर आणि कानाच्या बाजूला हातांनी चपराकी मारत. त्यांना कोणीतरी फुलवून लेखकाच्या घरची परिस्थिती चांगली आहे. म्हणून सांगितलेले असते. पुढे तर घाटगे क्लार्क व अक्कोळकर सर हेडमास्तरांना लेखकाबद्दल मुलीची छेड काढतो म्हणून खोटच सांगतात. यामुळे लेखकाला हेडमास्तरांची खुप बोलणी खावी लागतात. अक्कोळकर सरांचा लेखकावर अखेरपर्यत रोष राहतो.

### निकमसाहेब :

निकमसाहेब भूदान चळवळीचे मुख्य कार्यकर्ते. लेखकाची मुलाखत घेऊन त्याला रत्नागिरीला शिकण्यासाठी पाठवतात. त्याच्या घरची परिस्थिती समजून घेऊन त्याला अधिक मदत करतात. रत्नागिरीला असताना लेखकाच्या 'फी' भागविण्यासाठी पैसे पाठवून देतात. अनेक प्रकारे लेखकाला मदत, शिकण्यास प्रेरणा प्रोत्साहन देतात.

### प्राचार्य भावे सर :

कॉलेज असताना चिटणीस सरांच्या सांगण्यावरून आपल्या ग्रामीण कविता प्राचार्य भावे सरांना वाचावयास देतात. त्यांना त्या खूप आवडतात. या कविता वाचूनच ते लेखकाची बुध्दीमत्ता ओळखतात व त्याला प्रोत्साहन देतात. प्राचार्य भावे जास्त बोलत नसत. लेखकाला ते माटे, खांडेकर यांची पुस्तके वाचण्यास सांगतात. लेखकाच्या 'फी' चा प्रश्न सोडवतात व अनेक प्रकारे ते लेखकाला मदत करतात.

### पु. ल. व सुनितताई देशपांडे :

प्राचार्य भावे यांना पु. ल. व सुनितताई देशपांडे भेटायला येतात. लेखकाच्या कविता भावे त्यांना वाचायास देतात. त्या वाचून लेखकाच्या प्रासादीक रसरशीत भावना कवितेतील वास्तव ग्रामीण जीवन, त्यातील नाटय, तिच्यातला वेगळेपणा त्यांना आवडला. पु. ल. देशपांडेनीच त्यांना आनंद जकाते ऐवजी 'आनंद यादव' हे नाव दिले. कविता

पुण्याच्या आकाशवाणी केंद्रावर पाठविण्यास सांगतात. त्या रजिस्टर करण्यास पाच रूपये देतात. लेखकाला आकाशवाणी केंद्रावर नोकरी पु. ल. मुळेच मिळते. सुनितातांईच्या पत्रामुळे लेखकाला शिकण्यास प्रोत्साहन मिळते. त्या लेखकाला अनेकवेळा आर्थिक मदतही करतात. आलेल्या संकटात त्याला शिक्षणासाठी पु. ल. नी जे. पी. नाईकांना चिठठी देउन लेखकाची राहण्याची व्यवस्था करतात. लेखकाच्या कवितांना योग्य न्याय देतात. त्यामुळेच ग्रामीण साहित्यात आनंद यादव हे नाव पुढे आले.

## जे. पी. नाईक :

नाईकसाहेबाच्यामुळेच लेखकाला कोल्हापूर बोर्डिंगमध्ये प्रवेश मिळतो. ते मोठे शिक्षणतज्ञ होते. कोल्हापूर शहराचा मास्टर प्लॅन त्यांनी आखून तो प्रत्यक्षात जिद्दीने, प्रयत्नांनी अमलात आणला. पी. सी. पाटील यांच्या आत्मचरित्रामध्ये याबद्दल आठवणी वाचायला मिळतात. त्यांनी अनेक संघर्षाना तोंड दिले. त्यांच्या कडक स्वभावाविषयी त्यांची ख्याती होती. सर्व कोल्हापुरात त्यांच्याविषयी मनात दबदबा आणि आदर होता. यामुळे लेखकाला वारंवार त्यांच्याकडे पैसे मागताना भिती वाटत होती. पु. ल. च्या सांगण्यावरून लेखकाला जे. पी. नाईकांनी खूप मदत केली. यामुळेच लेखकाचा संबंध नाईकसाहेबांच्या कुटूंबाशी आला. गारगोटीला वास्तव्याला गेल्यावर लेखकाला कॉलेज सुटण्याची भिती वाटते. पण जे. पी. नाईक लेखकाला शिकायला प्रेरणा व प्रोत्साहन देतात. आर्थिक मदतही केली.

## वसंत पाटील :

हा लेखकाच्या बालपणाचा मित्र, लहानपणापासून त्याला आई वडिल नव्हते. तो आपल्या पाहुण्यांच्याकडे राहून शाळा शिकत होता. वसंत पाटील हा शाळेत खुप बुध्दीमान, हुशार होता. शाळा शिकत असतानाच तो खूप कष्ट करून शिकत असतो. तो शाळेत असताना चित्रेही खूप चांगली काढत होता. लेखक वसंत पाटील याच्याकडूनच चित्रे काढायला शिकला. अत्यंत गरीब परिस्थितीत वसंत पाटील शिक्षण घेत होता. वर्गात त्याचा पहिला नंबर असायचा. लेखकाचे लग्नही वसंत पाटील याच्या डॉक्टर मामाच्या मुलीशी होते.

## स्मिता :

लेखकाची पत्नी, वसंत पाटील याच्या डॉक्टर मामाची मुलगी स्मिताची आई स्मिता लहान असताना वारली. स्मिताला एक बहिण होती. त्यांची सावत्र आई मावशीच होती. स्मिताचे शिक्षण एस. एस. सी. पर्यंत झाले होत. पण लेखकाच्या मदतीने व

स्वत:च्या जिद्दीने ती आपले शिक्षण पूर्ण करून शिक्षिका होते. लेखकाला चांगली साथ दिली. लेखकाने सारखे घरी पैसे पाठविले म्हणून त्याला कधी बोलली नाही. सासरच्या लोकांवर तिने खूप माया केली. त्यांच्या सुख दु:खात ती सामील झाली. स्मिताला दोन मुली झाल्या. तिला मुलगा हवा होता परंतु होत नाही. ते खुप अंधश्रध्दाळू असल्याने मांत्रिकाला बोलविणे, उपास-तापास करणे असे तिचे उद्योग चालले असायचे पण शेवटी दोन मुलीवरच तिला समाधान मानावे लागते.

एखाद्या चांगल्या गुहिणीप्रामण ती संसार करून पतीला साथ देते. त्याच्या सुख दु:खात सामील होते.

झोंबी, नांगरणी, घरभिंती या आत्मचरित्रात्मक कादंबरीतून प्रामुख्याने ठळकपणे वरील व्यक्तिचित्रे आढळून येतात.

बहुजन समाजातील मुलांच्यावर कर्मवीर भाऊराव पाटील यांनी चांगले संस्कार व्हावेत ती पांढरपेशीतील मुलांच्याप्रमाणे आत्मकेंद्री होऊ नयेत. त्यांना आर्थिक बलाचा सामाजिक स्तराचा उपयोग करून देता यावा असा ध्येयवाद जोपासण्यासाठी त्यांनी प्रयत्न केला. संस्थेत शिकलेल्या व संस्थेबाहेर शिकलेल्या समाजात हा ध्येयवाद पाझरला. आनंद यादवांनी पांढरपेशा समाजात राहून हे संस्कार जोपासण्याचा प्रयत्न केला. यातूनच त्यांच्यातील प्राध्यापक, लेखक घडत गेले.

आनंद यादव यांनी शिकण्यासाठी खूप धडपड केली. वाट्टेल ते कष्ट उपसून शिकत राहिले. त्यांना अनेक शिक्षकांनी, समाजातील प्रतिष्ठित लोकांनी मदत केली. शिकून प्राध्यापक झाल्यावर आपल्या घरातील भाऊ, बहिण यांचे विवाह, त्यावेळच्यासमस्या, बहिणीचे मृत्यु, संसाराची दुर्दशा, आईच्या जीवनाची दीर्घकाळ झालेली परवड या सर्व गोष्टीचा खोलवर संस्कार त्यांच्या मनावर होत राहिला. उत्कट संवेदना अखेरपर्यंत त्यांनी टिकवल्या म्हणून या कलाकृती निर्माण झाल्या.

## भाषाशैली

लेखकाच्या भाषा शैलीवर त्याचे यश अवलंबून असते. कादंबरीतील भाषा ही तत्कालीन समाज व लेखक यांच्या व्यक्तिमत्वाचे रसायन असते. कादंबरीवर समाजातून जे जीवनानुभव घेतो. त्यातून संवेदनशील मनात निर्माण झालेल्या विविध जाणिवा, अनुभव यातून कादंबरीचे यश अवलंबून असते.

भाषा ही दुहेरी तर दुसरीकडे प्रकट मनावर ध्वनीचा संस्कार करते. लेखकाच्या तत्कालीन परिस्थितीचा परिणाम होतो. भाषेच्याव्दारे व्यक्त होणारा आशय हा माणसाचा सर्वांगीण अनुभव असतो. त्यात संवेदना, भावना व विचार या सर्वांचा समावेश झालेला

असतो. भाषा ही कालानुक्रमाने बोलली अगर लिहिली जाते. म्हणजेच ती काळात वावरणारी आहे.

## 'झोंबी'तील भाषाशैली :

'झोंबी' या आत्मचरित्रात्मक कादंबरीतील निवेदन पध्दती कालक्रमनिष्ठ आणि प्रथमपुरूषी आहे. रतनु-ताराच्या विवाहापूर्वीपासूनच चित्रण या कादंबरीत लेखकाने केले आहे. लेखक म्हणतो,"तारांच लग्न झालेलं ताराला माहित नाही. ती एक वर्षाची असताना तिच लग्न झालं. तिच्या पाळण्यालाच बाशिंग होत. रतनू त्यावेळी आठ नऊ वर्षाचा होता." [२६] पुढे याच पध्दतीने कादंबरीचे निवेदन सुरू राहून ते लेखकाची एस. एस. सी. चा निकाल लागून तो पास होतो. तेथे संपतो कादंबरीच्या आधीमध्ये लेखकाने वडील, मित्र शिक्षक यांच्याही तोंडी काही विधाने घातली आहेत. यामुळे कादंबरी संवादात्मक स्वरूपाची झाली आहे. त्यांचे संपूर्ण निवेदन आणि बहुतांशी संवादलेखन प्रमाण भाषेत केलेले आहे. जे सांगायचे आहे, ते ओघवत्या निवेदनशैलीमुळे 'नीट' पणे सांगितले गेले आहे. प्रमाणभाषेत निवेदन केलेल्या या आत्मकथनात अनेक ग्रामीण शब्द आले आहेत. उदा. फाळा, बाध्या, दुमाला, रातध्याड, धबडगा, विरकुंड, कावकिक्क, तारताळया भकणूक, गठडं, वारंगी, लोळगा, दन्नाट, लागीर, म्हाजूर, सपक, हाताबुडी, धडोती, म्हेनत्या, पान्हेव, टिप्पिरं, किनया, इस्वारा, शिणवटा, वखोटं, दीस, आचीर, पोलम्ी, धारण, कबुलायत, खुळांबा, नाबाठया इ. तसेच अस्सल ग्रामीण शिव्याही आल्या आहेत. उदा. रंडे, रांड, रांडच्या, सिंच्या, गतकाळे, सुक्काळीच, खज्जाळीच्या इत्यादी.

'झोंबी' तील भाषा ही शहरी ग्रामीण अशी संमिश्र स्वरूपाची आहे. तरीही ती पात्रांच्या जडणघडणीला साजेशी, अकृत्रिम आहे. त्यात प्रादेशिकता आहे. त्यांच्या अनुभवांना पुरेशी साथ करणारे आहे. लेखक आनंद यादव हे मूलतः कविप्रकृतीचे लेखक असल्यामुळे त्यांची लेखनशैली काव्यात्म आहे. गद्यपातळीवर एखादे विधान करताना मध्येच काव्यात्म प्रतिक्रिया व्यक्त करतात. उदा. "चोरून भाकरी पळवणारं कुत्र एकदा तडाख्यात सापडल्यावर जसं बडवतात, तस मलाबडवलं तेव्हापासून बिडीचं नाव नाही". [२७] आईच्यामनात रानडुक्कर खोल खेल रूतलेल," [२८] "आईची बारकी पोरं उघडून टाकलेल्या भाजीगत कोळूमसून गेलेली वाटायची", [२९] ती पाच सहा पोरांच्या पायावर संसार तुरूतुरू चालवित होती," "पालाकापता कापता मनात विचारांचया पेंढया विस्कटत होत्या". [३०] अशी काव्यात्मक भाषा आली आहे. ती त्यांच्या लिखाणाच्या शैलीमुळे कादंबरीशी जुळली आहे. लेखनाच्या ओघात आल्यामुळे कादंबरी प्रत्ययकारी झाली आहे.

'नांगरणी' मधील निवेदन पध्दती ही सुध्दा कालक्रमनिष्ठ, प्रथमपुरूषी आहे. 'नांगरणी' मध्ये भेटणा-या अनेक व्यक्तिंच्याव्दारे सुध्दा लेखकाने विधाने केली आहेत. 'नांगरणी' मध्ये ही नागर-ग्रामीण संमिश्र भाष आली आहे. 'झोंबी' प्रमाणे याही कादंबरीत काव्यात्मक भाषा आली आहे. उदा. " .... मला एकदम एकटं एकटं वाटू लागल. रात्रीच जेवन आटोपून मी खोलीवर आलो नि अंथरूणावर आडवा झालो. तुकारामाची पथारी तशीच पाखरू हरवलेल्या घरटयासारखी मोकळी पडली होती.", [३१] आपल्या मनाचं पाखरूही असंच एका निळयाभोर अनंत आकाशात भिरभिरतं आहे. " [३२] तसेच कोणी भाषेतील शब्द आले आहे. उदा. "पावणे इलेसत बसाक घोंगडी हाडरे ! "

अशा ग्रामीण नागर शब्द तसेच कोकणी, इंग्रजी शब्दही या कादंबरीतून आले आहेत. निवेदन शैली चांगली असल्यामुळे 'नांगरणी' वाचनीय झाली आहे.

'घरभिंती' मध्ये प्रामुख्यने लेखक शहरी भागातच राहायला असल्यामुळे शहरी-ग्रामीण भागातील शब्द या कादंबरीत आले आहे. बोलीचा पुरेसा वापर असलेली समर्पक भाषा या कादंबरीत आली आहे. 'झोंबी', 'नांगरणी' प्रमाणे 'घरभिंती' मध्ये काव्यात्मक भाषा आली आहे. झोंबी पासून घरभिंती या तीन आत्मचरित्रात्मक कादंब-यातून लेखकाचे निवेदन प्रथमपुरूषी आहे. इतर लेखकांच्या तुलनेने यादवांची लेखनशैली वेगळी आहे. यामुळेच या तिन्ही कादंब-यांना भरघोस यश मिळाले.

# संदर्भ ग्रंथ


| अ.नं. | पुस्तकाचे नाव | लेखक | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १ | साहित्य आणि साहित्यिक | संपादक वा.दा. गोखले | २९ |
| २ | नांगरणी | आनंद यादव | ११२ |
| ३ | नांगरणी | आनंद यादव | ११२ |
| ४ | नांगरणी | आनंद यादव | ११३ |
| ५ | घरभिंती | आनंद यादव | १२३ |
| ६ | घरभिंती | आनंद यादव | ३०७ |
| ७ | घरभिंती | आनंद यादव | ३२३ |
| ८ | घरभिंती | आनंद यादव | ४२४ |
| ९ | झोंबी | आनंद यादव | २८ |
| १० | झोंबी | आनंद यादव | ३० |
| ११ | झोंबी | आनंद यादव | १३९ |
| १२ | झोंनी | आनंद यादव | ३७३ |
| १३ | नांगरणी | आनंद यादव | १८ |
| १४ | नांगरणी | आनंद यादव | १९ |
| १५ | नांगरणी | आनंद यादव | २५ |
| १६ | नांगरणी | आनंद यादव | ७० |
| १७ | नांगरणी | आनंद यादव | १०९ |
| १८ | नांगरणी | आनंद यादव | २७३ |
| १९ | नांगरणी | आनंद यादव | ३४० |
| २० | घरभिंती | आनंद यादव | २० |
| २१ | घरभिंती | आनंद यादव | ५५ |
| २२ | घरभिंती | आनंद यादव | ७७ |
| २३ | घरभिंती | आनंद यादव | २७१-७२ |
| २४ | घरभिंती | आनंद यादव | ४९९ |
| २५ | झोंबी | आनंद यादव | २५ |
| २६ | झोंबी | आनंद यादव | १ |
| २७ | झोंबी | आनंद यादव | ४४ |

## संदर्भ ग्रंथ

| अ.नं. | पुस्तकाचे नाव | लेखक | पृष्ठ |
|---|---|---|---|
| २८ | झोंबी | आनंद यादव | १५० |
| २९ | झोंबी | आनंद यादव | १८२ |
| ३० | झोंबी | आनंद यादव | २०७-८ |
| ३१ | नांगरणी | आनंद यादव | ४७ |
| ३२ | नांगरणी | आनंद यादव | ४९ |
| ३३ | नांगरणी | आनंद यादव | ७३ |